# प्रस्तावना

सतराव्या शतकात महाराष्ट्रात मराठ्यांच्या सत्तेचा उदय झाला. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धातच येथे मराठ्यांचे राज्य निर्माण झाल्याचा पुकारा शिवाजी महाराजांनी स्वत:ला राज्याभिषेक करवून घेवून केला. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर या नवोदित स्वराज्याला अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. छ.संभाजी महाराजांनी अनेक संकटांना तोंड दिले. अखेर ते मोंगलांच्या हातात सापडले. त्यांचा वध झाला. त्यामुळे काही इतिहासकारांनी त्यांना स्वराज्याचा पहिला अपयशी वारस ठरविले.

संभाजीनंतर राजाराम महाराज (१६८९-१७००) गादीवर आले. त्यांनाही मोठ्या संकटांना तोंड देत राज्य राखावे लागले. तथापी त्यांची दृष्टी केवळ राज्य राखण्यावर नव्हती तर रामदासांच्या उपदेशाप्रमाणे -

आहे तितुके जतन करावे । पुढे आणिक मिळवावे ।

महाराष्ट्र राज्य करावे । जिकडे तिकडे ॥

या बाण्याची दिसते. त्याचे प्रत्यंतर त्यांच्या एका पत्रातून दिसते. राजारामानंतर ताराबाईनेही खूप संघर्ष करुन मराठ्यांचे राज्य टिकविले. येवढेच नव्हे तर तिच्या आणि अगोदर राजारामाच्या काळातही मराठी फौजा नर्मदा पार झाल्या होत्या.

छ.शाहू १७०८ मध्ये महाराष्ट्रात आला. आणि मराठ्यांच्यात यादवी सुरु झाली. मात्र ता.१२-१-१७०८ रोजी त्याचा राज्याभिषेक झाला.

छ.शाहूच्या नेतृत्वाखाली बाळाजी विश्वनाथने मराठ्यांच्या साम्राज्य विस्तारास नवी क्षितीजे निर्माण करुन दिली. पेशवा बाजीरावाच्या काळात तर मराठ्यांच्या स्वराज्याचे रुपांतर साम्राज्यात झालेच. सर्व साधारणपणे मराठ्यांचा साम्राज्य विस्तार म्हटले की, पेशवा बाजीरावच समोर येतो. अनेकांनी त्यावर आतापर्यंत इंग्रजी, मराठीत लेखन केले आहे. परंतु शिवोत्तर कालखंड ते पेशवा बाजीराव असा मराठ्यांच्या साम्राज्य विस्ताराचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला दिसत नाही. त्यादृष्टीने बाजीराव पूर्व काळातही मराठ्यांच्या साम्राज्य विस्ताराच्या प्रयत्नांची दखल घेऊन बाजीराव पेशव्याच्या काळापर्यंत त्या अभ्यास करण्याचे प्रस्तुत लघुशोध प्रबंधात योजले आहे.

आतापर्यंत शिवकाल आणि शिवोत्तर काल असे विभाजन करुन अनेकांनी लेखन केले आहे. ग्रँट डफचा मराठ्यांचा इतिहास (खंड १ ते ३), रियासतकार सरदेसाई यांच्या मराठी रियासती, व्ही.जी. दिघे यांचा बाजीराव पाहिला आणि मराठ्यांच्या सत्तेचा विस्तार, एच.एन.सिन्हा यांचा Rise of Peshwas इ. ग्रंथ उदाहरणादाखल सांगता येतील. प्रस्तुत विद्यार्थ्याने वरील सर्वांचा उपयोग केलेला आहेच परंतु त्याचबरोबर बऱ्याचशा अस्सल प्रकाशित साधनांचा तसेच पुणे पुराभिलेखागारातील काही अप्रकाशित कागदपत्रांचा उपयोग सदर शोध प्रबंधासाठी केलेला

आहे. भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकाच्या काही अंकात तसेच मुंबईच्या इतिहास आणि संस्कृती या त्रैमासिकातील काही अंकातून उपयुक्त माहिती मिळाली. तिचाही यथायोग्य उपयोग करुन घेतला आहे.

प्रस्तुत लघुशोध प्रबंधाची मांडणी एकूण सहा प्रकरणांमधून केलेली आहे. पहिल्या प्रकरणात भौगोलिक परिस्थिती, शिवपूर्वकालीन राजकीय इतिहास आणि साधनांचा आढावा घेतला आहे. दुसऱ्या प्रकरणात बाजीरावपूर्व मराठ्यांच्या साम्राज्य विस्ताराच्या प्रयत्नांची चर्चा केली असून विशेष संदर्भ कोकण किनारपट्टीचा घेतला आहे. तिसऱ्या प्रकरणात बाजीराव पेशव्याच्या कालखंडातील प्रदेश विस्तार, त्याच्या प्रदेश विस्ताराच्या कल्पना, त्याच्या संदर्भात उपस्थित केला गेलेला उत्तर दक्षिण वाद आणि त्याचे सरदार इत्यादींची चर्चा केली आहे.

चौथ्या प्रकरणात मराठ्यांच्या माळवा, बुंदेल खंड, गुजराथ इत्यादी ठिकाणच्या प्रदेश विस्ताराचा विचार केला आहे. तर पाचव्या प्रकरणात मराठ्यांच्या विशेषत: दक्षिण धोरणाचा विचार केला असून सहावे प्रकरण हे उपसंहाराचे आहे.

आभार -

हा लघुशोध प्रबंध तयार करण्यासाठी मला अनेकांचे अनेक प्रकारे सहाय्य झाले.

शिवाजी विद्यापीठातील इतिहासाचे प्राध्यापक डॉ.व्ही.एस.कदम यांनी मोलाची मदत केली. त्यांच्याशी या विषयावर अनेकवेळा चर्चा करण्याची संधी मला या निमित्ताने मिळाली. त्यांच्या चर्चेतून अनेकवेळा नवनवीन मुद्दे मला मिळत गेले. अनेकवेळा त्यांनी मला प्रत्यक्ष आणि पत्राद्वारे क्वचित प्रसंगी फोनवरही लिखाणाच्या बाबतीत सूचना केल्या. काही वेळेस माझ्या लेखनाच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारी संदर्भ साधनेही लावून ठेवलेली असायची. त्यांच्या एकूण मार्गदर्शनामुळेच माझ्या लेखनाचे काम अतिशय सुकर झाले. त्यांचे मन:पूर्वक आभार मानणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

ज्या गोगटे-जोगळेकर महाविद्यालयात मी अध्यापनाचे काम करीत आहे त्या महाविद्यालयाचे निवृत्त प्राचार्य अ.ल.जड्ये यांनी मला या कामासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार जी एक वर्षाची रजा मंजूर केली त्यामुळेच मला कोल्हापूरसारख्या ठिकाणी राहून हे काम करणे शक्य झाले. विद्यमान प्राचार्य सुभाष देव यांनी प्रबंध लेखनाचे काम पूर्ण करा असा सतत लकडा लावल्याने ते लवकरात लवकर पूर्ण झाले. अन्यथा अजूनही रेंगाळतच राहिले असते. त्या दोघांचाही मी आभारी आहे.

विशेष म्हणजे पूणे येथील निवृत्त प्राचार्य सदाशिव आठवले यांनी वेळप्रसंगी पत्राने आणि काहीवेळेस प्रत्यक्ष या विषयाच्या अनुषंगाने माझ्याशी चर्चा केली. तसेच पूणे येथील पुराभी लेखागारातील अप्रकाशित पत्रांचा अनुवादही करुन दिला. त्यांच्या या मदतीबद्दल त्यांचे आभार मानणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

पूणे आणि कोल्हापूर येथील पुराभी लेखागारातील अधिकारी वर्गांनी मला तेथील साधनसाहित्य वापरण्यास अनुमती दिली. म्हणून संबंधीत अधिकाऱ्यांचे मन:पूर्वक आभार.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शासकीय विभागीय ग्रंथालय, रत्नागिरी आणि रत्नागिरी नगर जिल्हा वाचनालय या तीन ग्रंथालयांचा मी प्रामुख्याने उपयोग करुन घेतला आहे. रत्नागिरी येथील विभागीय ग्रंथालयातील श्रीकृष्ण साबणे आणि रत्नागिरी जिल्हा वाचनालयाचे ग्रंथपाल श्री.रघुनाथ सावंत या दोघांनी मला ग्रंथ देवघेवीच्या बाबतीत फार मोठी मदत केलेली आहे. त्या दोघांचे जाहीर आभार मानलेच पाहिजेत इतके ते कार्य मोठे आहे.

प्रस्तुत लघुशोध प्रबंध ज्या आकर्षक पध्दतीने आपणा सर्वासमोर येत आहे त्याचे श्रेय योगिता प्रिंटर्स, रत्नागिरीचे श्री.राहूल पंडित आणि सौ.ऋता पंडित या दोघांना दिलेच पाहिजे. त्यांचे शाब्दीक आभार मानून मोकळे होणे मलाही आवडणार नाही आणि त्यांनाही नाही.

या पलिकडे जावून माझ्या या कामाला माझ्या अनेक चाहत्यांचा अनेकप्रकारे हातभार लागला आहे. त्या सर्वांचाच ऋणनिर्देश करण्यापेक्षा मला त्यांच्या ऋणातच राहणे आवडेल.

## महत्वाच्या संदर्भांचे संक्षेप

केळकर, न.चि. आणि द.वि.आपटे - शिवकालीन पत्र सारसंग्रह - शि.प.सा.स.

खरे, ग.ह. - ऐतिहासिक फारसी साहित्य - ऐ.फा.सा.

गाडगीळ, स.रा. - सभासद बखर - स.ब.

गुजर, मा.वि. - करवीर छत्रपती घराण्याची कागदपत्रे - क.छ.घ.का.

जुवेकर, प्रमोदिनी - छत्रपती राजाराम महाराजांची बखर - छ.रा.म.ब.

जोशी, प्र.न. - आज्ञापत्र - आज्ञा

पवार, अप्पासाहेब - ताराबाईकालीन कागदपत्रे खंड १ - ता.का.

पारसनीस, द.ब. - शाहू रोजनिशी - शा.रो.

पिंगुळकर, व्ही.पी. - सावंतवाडी संस्थानचा इतिहास - सा.सं.इ.

बेंद्रे, वा.सी. - महाराष्ट्रेतिहासाची साधने - म.सा.

राजवाडे, वि.का. - मराठ्यांच्या इतिहासाची साधने - म.इ.सा.

वर्टीकर, श.ह. - कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याची कागदपत्रे - घो.घ.का.

सरदेसाई, गो.स. - पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद - पे.द.

सरदेसाई, गो.स. - मुसलमानी रियासत - मु.र.

सरदेसाई, गो.स. - मराठी रियासत - म.र.

पगडी, सेतुमाधवराव - मराठे व औरंगजेब - म.औ.

पगडी, सेतुमाधवराव - मराठे व निजाम - म.नि.

पगडी, सेतुमाधवराव - मराठ्यांचे स्वातंत्र्ययुध्द - म.स्वा.यु.

पगडी, सेतुमाधवराव - मोघल आणि मराठे - मो.म.

पगडी, सेतुमाधवराव - मोघल दरबारची बातमीपत्रे - मो.द.बा.

पिसुर्लेकर, पांडुरंग सखाराम - पोर्तुगीज मराठे संबंध - पो.म.सं.

देसाई, स.शं. - करवीर छत्रपती आणि कोल्हापूर - क.छ.को.

देसाई, स.शं. - पोर्तुगीज दफ्तर खंड ३ - पो.द.

देसाई, स.शं. - पोर्तुगीज मराठे संबंध - पो.म.सं.

देसाई, स.शं. - मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड २ - म.इ.सा.

देसाई, स.शं. - शिवशाही पोर्तुगीज कागदपत्रे - शि.पो.का.